
NEHRU
BAL PUSTAKALAYA

7146

# वेडा आंबा

आ. ना. पेडणेकर




नेहरू बाल पुस्तकालय

# वेडा आंबा

आ.ना. पेडणेकर

चित्रे

मंजुळा पद्मनाभन



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-0604-9

पहिली आवृत्ती : 1986 *(शके 1908)*

आठवी आवृत्ती : 2000 *(शके 1922)*

नववी आवृत्ती : 2003 *(शके 1924)*

© आ. ना. पेडणेकर, 1984

Mad Mango *(Marathi)*

**रु. 14.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.




पावसाळचामागून पावसाळे जात होते.

आंबा हात पसरून आकाश धरू पहात होता. त्याचे पाय जमिनीत खोल खोल शिरत होते. पण तो आपला एकाच जागी उभा होता. त्याच्याभोवती कितीतरी नवे दोस्त जन्मून वाढू लागले होते. पूर्वेकडचा फणस त्याच्यानंतर चार पावसाळचांनी जन्मला होता. कालपरवाची बोर किती मोठी झाली होती. पांढऱ्या फुलांनी डंवरलेला शेवगा त्याच्या सावलीतच वाढला होता.

त्याला ठाऊक नव्हते फक्त चिंचेचे आयुष्य. म्हातारीने किती पावसाळे पाहिले होते, ते समोरच्या देवळातल्या देवालाच माहीत. म्हातारी म्हणायची, हे देऊळ माझ्या जन्मानंतरचं आहे.

इतकी वर्षे लोटली तरी चिंचबाई ताठच. तिच्या गोष्टी ऐकत सावलीला गुरें येऊन बसत. वानरांचा कळप कधी सूरपारंब्या खेळायला येई. कधी चिमण्या भिरभिरत





फांद्याफांद्यांना आकडे लटकू लागले की, पोरांच्या तोंडाला पाणी सुटे. चिंचेवर दगडांच्या सरी पडू लागत.

आंबा विचारी, आजी, तुला या पोरांचा राग नाही येत? ती म्हणायची, जाऊ दे रे, वर्षभर थोडीच छळणार आहेत? आपण तरी काय करणार. पळून थोडे जाणार?

आंब्याला पहिल्यांदा मोहर आला, तेव्हा चिंचबाई म्हणाली होती, गड्या सांभाळ आता. आता दगड येतील तुझ्याशी कानगोष्टी करायला. आणि खरेच तुकतुकीत कैऱ्यांसाठी गलोलातून दगडांच्या हाका सुरू झाल्या. दुखऱ्या अंगाने तो चिंचबाईला म्हणाला, आजी, इथून पळून जावंसं वाटतं.

चिंचबाई हसली, म्हणाली, पळून जाणार? अहा रे वेड्या. आपल्या नशिबात जागा सोडणं नाही. जिथं जन्म झाला तिथंच मरायचं.

तेव्हापासून आंबा विचार करू लागला.

पाखरं हवी तशी भराऱ्या मारतात. शेरडं मनाला येईल तशी बागडतात. ढग मनसोक्त फिरतात. माणसं हिंडत राहतात. मला मात्र जागा सोडता येत नाही. मी असं काय पाप केलं आहे? मी जागा सोडली तर काय होईल?


तो भोवतालच्या दोस्तांना आपले विचार सांगू लागला. पण त्याला कोणी साथ दिली नाही. सगळ्यांनी त्याला पटवून देण्याचा प्रयत्न केला. देवाची इच्छा तसंच राहिलं पाहिजे. त्याच्या मनात नाही, त्याला काय करणार? आपण उंच वाढतो. फांद्या पसरवतो. पावलं खोल खोल रिचवतो—हे सगळं फिरण्यासारखंच नाही काय? अरे, बसल्याजागी – बरे उभ्या जागी म्हण – इथंच अन्न मिळत असताना दमछाक करण्याचा हट्ट कशासाठी?

सगळ्यांनी त्याचं नाव ठेवलं "वेडा आंबा"

वेड्या आंब्याच्या सावलीत पूर्वीसारखे वाटसरू येऊन बसत. विश्रांती घेत. न्याहरी करीत. झोपी जात. पुष्कळदा ते आपापसात देशोदेशीच्या गोष्टी करू लागत.

हिरव्या शेतातील पांढरा ससा टाहो फोडत पिसारे उभारणारे मोरांचे कळप, डोंगरापलीकडील निळीभोर नदी, पोपटांचा उडणारा हिरवा गालिचा, तिळाची पिवळीधमक शेती, गर्जत पडून मग फेसाळणारा धबधबा, आभाळात घुसणारे काळे निमुळते कडे, पांढरा शुभ्र वाळूचा किनारा, त्यापलिकडे पसरलेला समुद्र—जवळच्या फणसाला, जांभळीला, रातांब्याला कितीएक जणांना त्याने विचारले होते, माझ्याबरोबर प्रवासाला निघणार काय? नाही रे बाबा. प्रत्येकाचा सूर एकच ठरलेला, शब्द मात्र वेगळे. इथं काय कमी आहे? कुठंही गेलं तरी तेच तेच आकाश. तीच माती. अरे, झाडांच्या जातीनं आपली मूळची माती कधी सोडली आहे काय?


आता आंब्यांच्या मनाने घेतले—ही भोवतालची मंडळी मूर्ख आहे, आळशी आहे. माझ्याबरोबर कोणीच येणार नाही. मला एकट्यालाच जावं लागणार.





मनात सारखे प्रश्न आल्यामुळे त्याचा आकार प्रश्नचिन्हासारखा होऊ लागला. एके दिवशी आकाशात काळे निळे ढग जमले. त्यांचा गडगडाट सुरू झाला. विजा चमकू लागल्या. मुसळधार पाऊस सुरू झाला. कडाड् धप् अशा आवाजाने आंब्याने दचकून पूर्वेकडे पाहिले.

वादळाने फणसाला मुळासकट उखडून टाकले होते. त्याची मातीने माखलेली पावले बाहेर दिसू लागली. अरेरे. ही पावले जन्मभर एकाच जागी खिळून पुरून मातीत राहिली होती. ना बाहेरचं ऊन ना वारा. आंब्याला वाटले माझी पावलं अशीच कासावीस होत आहेत. बिचाऱ्या फणसानं डोंगरापलीकडचं जग न पाहताच प्राण सोडला. एकदाही चार पावलं मोकळेपणानं फिरला नाही.

काही दिवसात जवळपासच्या माणसांनी फणसाच्या शरीराचे तुकडे तुकडे करून नेले. उरलेला भाग पेटवला. त्या आगीमुळे आंबा होरपळून निघाला. एकेदिवशी शेजारची दोन माणसं त्याच्याजवळ आली आणि भांडू लागली.








ए, खबरदार, आंबे पाडशील तर. हे माझं झाड आहे.

ठेवलं आहे तुझ्या बापानं.

त्यांच भांडण ऐकून आंबा थरारला. उन्हात तळपणाऱ्या कुऱ्हाडीचे पाते त्याच्या डोळ्यासमोर लखलखले. जांभळीवर काही दिवसापूर्वी बसलेले घाव त्याला पुन्हा ऐकू येऊ लागले. जांभळीला तोडताना पाहून सगळेच हादरून गेले. कोणालाच पायाखालची भूमी सोडून जाण्याची इच्छा नव्हती. आंब्याने निश्चय केला, आज रात्री काही झालं तरी इथून पसार व्हायचं. मग जांभळीप्रमाणे आपल्यावर कुऱ्हाडीचे घाव बसणार नाहीत. संध्याकाळच्या मंद प्रकाशात आंब्याने भोवताली पाहून घेतले. इतक्या वर्षाच्या सोबतीमुळे त्याला सगळ्याबद्दल आपुलकी वाटत होती. पण यांच्यामध्ये आता जीव अडकवून ठेवणे बरोबर नाही. आज येथून निघालंच पाहिजे. काळ्या ढगात वीज चमकते, तशी त्याच्या भयभीत काळजात कुऱ्हाडीचे पाते लखलखले.



आंब्याची पावले हलके हलके मातीबाहेर पडली. माळावरचा वारा त्यांना म्हणाला, अरे, चला फिरायला. जग किती सुंदर विविध गोष्टींनी नटलेले आहे. आता त्याच्या फांद्या पंखांसारख्या खालीवर होऊ लागल्या.

रात्र पडली. आभाळात चांदण्या चमकू लागल्या. भोवतालच्या घरात दिवे मिणमिणू लागले. पक्ष्यांची किलबिल थांबली. रातकिडे किरकिरू लागले.

अशावेळी वेडया आंब्याने आपले घर सोडले. आपले दोस्त सोडले. त्याची पावले उत्सुकतेनं पुढं सरकली. भोवताली सगळे गाढ झोपले होते. कुणालाच त्याचे जाणे कळले नाही.

उद्या सकाळी धुक्याची चादर बाजूला करीत ते उठतील. डोळे चोळीत पुनः पुन्हा पाहातील. आश्चर्याने एकमेकांना विचारतील, आंबा कुठाय. वेडा आंबा कुठाय?



तो चालताचालता स्वत:शीच हसला. भोवतालच्या झाडांना त्याच्या हातांचा स्पर्श होत होता. त्याच्या पावलांच्या आवाजाने ती जागी होत होती. डोळे चोळून चोळून ती त्याच्याकडे पाहत होती. पण त्याच्या हे लक्षात आले नाही.

त्याला चालण्यात किती मजा वाटत होती. मऊ मऊ मातीवरून घसरत जाण्यात केवढे सुख होते. अंगावर येणारा वारा झेलण्यात केवढी गंमत होती. पावलापावलाला नवी जमीन नवे जग, छे, छे आजवर मी उगाच एका जागी जखडून राहिलो होतो.

आता तो पाऊलवाटेने चालला होता. उताराची वाट. मजेत घरंगळत चालला होता. वाटेवरचे गवत पायांना गुदगुल्या करीत होते. तो शीळ घालत घालत रस्त्याच्या कडेला आला. तो तसाच रस्ता ओलांडून पलीकडे जाणार होता.

''वेडचा .....''

वेडा आंबा चमकून थांबला. इकडेतिकडे पाहू लागला. हचा गुलमोहराला कसं कळलं माझं नाव?

गुलमोहराने आपले लाललाल हात त्याच्यासमोर धरले. म्हटले, वेडचा, रस्ता ओलांडू नकोस. फुकट मरशील.

आंबा तसाच उभा राहिला. तेवढचात दोन प्राणी प्रकाशाचे झोत टाकीत सुंई करीत रत्यावरून मोठ्या वेगाने गेले.

पाहिलंस? हे असले प्राणी सारखे धावत असतात.

मला पलीकडं जायचं आहे. मी खूप दुरून आलोय.

तुला त्या डोंगर माथ्यावर जायचं असेल.

होय रे होय आंबा म्हणाला.

मग त्याच्या पलीकडे असलेल्या नदीकडं जायचंय?



अगदी बरोबर. तुला कसं कळलं?

माझ्यासुद्धा तेच मनात आहे. गुलमोहर म्हणाला.

हो का? मग चल माझ्याबरोबर. आतापर्यंत मी खूप जणांना विचारलं. कोणीच बरोबर येण्यास तयार होईना. तूच एक सापडलास. आंबा उत्साहाने बोलत राहिला.

अरे बाबा, धीर धर. गेली कितीतरी वर्ष मी इथं उभा आहे. पण रस्ता ओलांडून पलीकडे जायची संधीच मिळत नाही.

गुलमोहर असे म्हणत असताना आणखी एक प्राणी समोरच्या रस्त्यावरून धावत गेला त्याचे डोळे गरगरीत वाटोळे होते. त्यातून प्रकाश बाहेर पडत होता. त्याची पावले गरगरत होती. जाताना तो घरघर आवाज करीत होता आंबाही थोडासा चरकला.

हे कोठून येतात, कोठं जातात काही कळत नाही. सारखी येजा चालू असते. मला त्यांची फार भीती वाटते. परवा बघता बघता एकानं एका वासराला सपाट केले.

गुलमोहर दबल्या आवाजात बोलत होता. त्यान आंब्याचा हात धरला. गुलमोहराचा थरकाप आंब्याला कळला.

अरे, असं घाबरून कसं चालेल? चलाखी - थोडी चलाखी पाहिजे. ते त्या वळणावरून इकडे येईपर्यंत आपण सहज रस्ता पार करू. आंबा म्हणाला.

नको बाबा. तू हो आधी पुढं मी येतो मागून. सांभाळून जा हो. गुलमोहर काही केल्या जागा सोडीना.

वेडा आंबा पुढे सरकला. त्याने उजवीकडं वळून पाहिले. कुणी नव्हते. रस्त्यावर पाऊल ठेवलं, तसा घाबरलेल्या रडवेल्या सुरात गुलमोहर बोलला, सांभाळ.

आंबा रस्त्यावर आला. तेवढ्यात दूरून प्रकाशाचा झोत त्याच्या अंगावर पडला. आंबा चमकून दचकून रस्त्यावर वेडावाकडा धावू लागला. प्रकाशाचा झोत जवळ आला. आंब्याने डोळे मिटून घेतले. धडधडत्या काळजाने रस्त्याच्या पलीकडे पाऊल टाकले. धड.... कडाड .... खर्र.

आंब्याने डोळे उघडून मागे पाहिले. मघाचा तो भयंकर प्राणी गुलमोहराच्या अंगावर थांबला होता. गुलमोहर खाली चिरडला गेला होता. त्या प्राण्याच्या पोटातून माणसं बाहेर येऊ लागली. आपापसात बोलू लागली.

काय रे ड्रायव्हर? प्यालाबिला आहेस की काय?

छ्या ....छ्या .... अरे, रस्त्यात झाड दिसलं .... अगदी चालत असल्यासारखं वाटले.





ही भुताटकी आहे की काय? तरी बरं कुणी मेलं नाही.

देवाशपथ. झाड चालताना पाहिलं मी.

स्वप्नात होतास? वेडया, झाडाला काय वेड लागलंय? ते आपली जागा कशाला सोडील?

माणसे त्या प्राण्याच्या पोटात शिरली पुन्हा त्या प्राण्याने डोळे उघडले आणि तो भरधाव निघाला.

आंब्याच्या पोटात गलबलले. त्याला वाटले आपल्या दोस्ताची चौकशी करावी. त्याला उठायला मदत करावी. पण आंब्याला पुन्हा रस्ता ओलांडण्याचे धैर्य झाले नाही. त्याने पलीकडूनच भरल्या डोळ्यांनी गुलमोहराचा निरोप घेतला. डोंगरमाथ्याच्या दिशेने चालायला सुरुवात केली. उडया मरीत जाणाऱ्या बेडकाची आठवण झाली. तेव्हा तो तशा उडया मधून मधून मारू लागला.

त्याला एके ठिकाणी थोडी गडबड ऐकू येऊ लागली. अंधारातून हळूहळू चालत तो तिथे पोहचला

बत्त्यांच्या प्रकाशात माणसे जमली होती. मुले दंगामस्ती करीत होती. त्याच्यासमोर एक लाल पडदा टांगलेला होता.

अरे नाटक सुरू होणार तरी केव्हा? कुणीतरी ओरडलं. आंब्याला वाटलं, आत पडद्याच्या मागं काय आहे ते पाहावं. तो हळूच अंधारातून तिथं गेला. त्यानं आत डोकावून पाहिलं माणसांची धावपळ सुरू होती. कुणी सामानाची मांडणी करीत होते. कुणी कपडे बदलीत होते.



कुणी केस विंचरीत होते. एक बाई आरशासमोर उभी राहून लचकत होती. आंब्यान हळूच एक पान तिच्या मानेवर टाकलं. तशी ती अश्शी किंचाळली की बाकीची माणसे तिच्याकडे धावली.

आंबा मुकाट उभा राहून धावपळ पाहू लागला. आता तेथे धूप जळू लागला.त्या वासाने आंब्याचा जीव सुखावला. कुणीतरी घंटा वाजवली. बाहेरची प्रेक्षकमंडळी शांत झाली.

तेवढ्यात एकजण दुसऱ्याला म्हणाला, अरे, पहिला प्रवेश जंगलाचा आहे. राजपुत्र झाडामागं उभा राहून राजकन्येला पाहतो. इथं एक झाड हवं आहे. आता?

आंब्याने ठरले आपणच त्या झाडाचं काम करायचं. तेवढ्यात जोराचा वारा आला. बत्या खूप मंद झाल्या. आंबा हलकेच स्टेजवर चढ़ला. एक चष्मेवाला स्टेजवर आला. आला तो सरळ आंब्यावरच आदळला. एक शिवी देऊन म्हणाला, अरे, हे लचांड इथं कोणी आणलं?

माणसं गोळा झाली. सगळी आश्चर्य करू लागली.

स्टेजवर हे झाड कोणी ठेवलं?

पहिल्या प्रवेशाला ठीक आहे,पण मग ते उचलून कसं ठेवायचं? कुणीतरी म्हटलं, कुऱ्हाड आणून झाड तोडायला हवं. आंब्यासाठी पोरांनी दगड मारले. बत्त्या विझल्या.सगळीकडे अंधार पडला. आंब्याने हलकेच काढता पाय घेतला. शेजारच्या गावातून नाटक बघायला येणाऱ्या मंडळीनी झपाटचानं धावणारं झाड पाहिलं. भूत .... भूत .... भूत त्यांची बोबडी वळली. ते मागच्या मागं गावाला पळाले.



आंबा मग एका झोपडीपाशी गुपचुप उभा राहिला. झोपडीत दिवा मिणमिणत होता. दोन मुले रडत असल्याचे ऐकू येत होते. त्यांचे वडील त्यांची समजूत घालीत होते.

बाबा, आजदेखील तुम्ही आंबे आणले नाहीत.

काल म्हणाला होता ना?

काय कटकट लावलीय रे तुम्ही? चला बाहेर.

मुलांना बाहेर काढलं आणि वडिलांनी धाड्दिशी दार लावून घेतले. ते रागाने म्हणाले खा.आता पोटभर आंबे खा.







बाहेर सर्वत्र अंधार होता. पोरं भेदरून एकमेकांना बिलगून झोपडीच्या दाराशी उभी राहिली. आंब्याला त्यांची दया आली. त्यांची गंमत करण्याचे त्याने ठरवले. त्या विचारासरशी तो खुदकन् हसला.

तो हसला तसे तीनचार आंबे मुलांच्या समोर पडले. टप् .... टप् .... टप .... मुलांनी भराभर आंबे गोळा करायला सुरुवात केली. त्यांना अंधाराचा विसर पडला. त्यांनी वडिलांना हाक मारली.

बाबा, दार उघडा. आम्ही आंबे आणले आहेत. खूप खूप आंबे.

कुणी दिले रे? आईने आतून विचारले.

आंब्याच्या झाडानं दिले. बाबांनी झाडाला बोलावून आणल होतं ना? आईवडील बाहेर आले. खरेच झोपडीच्या दारातून बाहेर पडलेल्या प्रकाशाच्या पट्टचात आंब्याचा बुंधा दिसत होता. वडलांचा आपल्या डोळचांवर विश्वास बसेना. त्यांना वाटलं आपण स्वप्नात आहोत. त्यांनी आंब्याला हात लावून पाहिला.

आईला वाटलं, कधीकाळची पुण्याई फळाला आली. लग्न झाल्यापासून तिला वाटत होतं, आपल्या हक्काचं एकतरी झाड आपल्या झोपडीसमोर हवं. आज तिची इच्छा पूर्ण झाली. तिनं घरात जाऊन कुंकवाचा करंडा आणला. तांदूळ आणले. त्याच्या अंगाला कुंकू-तांदूळ लावून म्हटलं, बाबा, आता आला आहेस, तो सुखानं जन्मभर रहा. कुठंकुठ् जाऊ नकोस. आंब्याला वाटलं ओरडून सांगावं, मला तहान लागली आहे. थोडं पाणी द्या तो ओरडून म्हणाला, पण कुणाला ऐकू गेलं नाही. मुलांचे वडील डोळे चोळीत म्हणाले, ही नसती आफत आलीय. हा आंबा कुणाच्या मालकीचा आहे कुणास ठाऊक? उद्या त्याचा मालक ग्रामपंचायतीत फिर्याद करील.मग आपल्यावर चोरीचा आळ येईल. हातकडचा घालून नेतील.

इकडं पोरं आंब्याच्या झाडाला झोका बांधायचा विचार करीत होती. एकजण म्हणाला, बाबा हे झाड रातोरात पळून जाईल. त्याला बांधून ठेऊ या.

शहाणाच आहेस? कशाला बांधणार? दुसऱ्याने विचारले.
घराला बांधून ठेवू.
त्यानं फरकटत आपलं घर नेलं तर?
वडील म्हणाले, मला एक युक्ती सुचली. आपण याचे सरपण करू या.
सरपण? आंब्याला हा शब्द नवीन होता.



सरपण केल्यावर कोणाला ओळखता येणार नाही. वर्षभर जळणाचा प्रश्न मिटेल. गोविंदा, कुऱ्हाड घेऊन ये.

कुऱ्हाड .... तुकडे .... जळण .... आई ग! आंब्याने त्यांच्या डोळ्यांसमोर धूम ठोकली.

अरे झाड पळतंय - झाड पळतंय.

बघता बघता आंबा दूर जंगलातील झाडात दिसेनासा झाला. त्यानं कान दिला वेशीपर्यंत माणसं ओरडत आली होती.

कोण रे तू? करडा आवाज कानावर पडताच तो दचकला. त्यानं पाहिले, तो सागाच्या राखीव जंगलात आला होता. सागाचे मोठाले वृक्ष पलटणीतल्या शिपायांसारखे दणकट, उंच, करारी दिसत होते.

इथ कशाला आलास? दुसऱ्यानं विचारलं.

अरे हा प्रदेश सागाच्या जातीचा आहे. तू इथून जा. एका म्हाताऱ्या सागांने सांगितले.

आंबा मुकाट्याने जाऊ लागला. तो चालत राहिला. वाटेत कुठ पाणी दिसेना. त्याचा जीव कासावीस झाला. थंड पाण्यात राहण्याची पावलांना ओढ लागली. वाटेत एक वृक्ष उंबर दिसला. आंब्याने त्याला विचारले, उंबरदादा, पाणी मिळेल का थोडं?


अरे झाडाच्या जातीचाच ना तू? कुठं काय विचारतोस? लाथ मारीत खाली खाली जा पाणी मिळेल.

इथं जवळ नदी नाही?
नदी? नदी म्हणजे काय बुवा?
नदी म्हणजे वाहाणारं पाणी.
त्यासाठी पावसाळ्यापर्यंत थांबावं लागेल.

आंबा धुक्यातून चालत होता. तहान लागलेली. डोळ्यात जागरण. वाट खडकाळ. भोवताली झाडं. कोणाकोणाला धक्का लागत होता.







ऐ मेल्या, डोळे फुटले काय? आवळीचा प्रश्न.
ए गडचा, जरा दमानं घे की. हरडचाचा सल्ला.

सूर्य वर आला. वाट स्पष्ट दिसू लागली. आंब्याला थकवा आला. घाम आला. उन्हे वाढत होती. धापा टाकीत टाकीत शेतकऱ्याचं एक कुटुंब तिथे आलं. शेतकरी, मुलगा आणि शेतकऱ्याची बायको.

सावलीत बसता बसता शेतकरी म्हणाला, देवानंच हे झाड इथ उभं केलंय आपल्यासाठी.

त्याच्या बायकोचं लक्ष एवढचातच वर गेलं. ती म्हणाली, अहो, वर आंबे आहेत. दोन दगड मारा तर खरे.

मुलगा म्हणाला, होय बाबा, मला भूक लागलीय.
नाहीतर झाडावर चढून काढा.
छे आपण नाही असलं काम करणार. एवढचात आंब्याने पाचसहा आंबे हलकेच खाली टाकले.

अग्गो बया. देवानंच टाकले आंबे. का हो आतातरी खायचे का नाही?
खाऊ या. आपणहून पडले आहेत. त्याची इच्छा मोडायची नाही. आंबा मनाशीच हसला.

हे बघा, बाठचा वाटेत मधे मधे टाकायच्या. वाटेवर नवीन झाडं रुजायला हवीत.
आंब्याला धन्यता वाटली. उपकार करण्यात केवढा आनंद आहे, ते त्याला कळले.

आंबे खाऊन झाले, तसा मुलगा वर पाहू लागला.
बाबा, आणखी आंबे आहेत वर.
अरे, तुझं पोट भरलं ना?
हो.
मग आणखी आशा का करतोस.

शेतकरी म्हणाला, हे बघ लक्षुमी, अधिक लोभ वाईट. पुन्हा दुसरे वाटसरू येतील. ते थकलेले असतील. भुकेलेले असतील. त्यांना नको का काही आंबे? आपल्या आधी कोणी सकाळी खाल्ले असते तर आपल्याला मिळाले असते का?

मग तिघेही सावलीत थोडीशी पडली. पडल्या पडल्या शेतकरी म्हणाला, हया झाडाचं आयुष्य किती चांगलं? त्यांना एका जागी राहून पोट भरता येतं. आम्हाला किती धावपळ करावी लागते. घरातून शेतात, शेतातून बाजारात, बाजारातून जंगलात, जंगलातून गावात. माझ्या पावलांची तर अगदी चाळण झाली.

त्याचं बोलणं ऐकूण आंबा हसला. अरे, एका जागी राहून मी किती कंटाळलोय. तू दोन दिवस उभा राहून बघ – वैताग येईल नुसता वैताग! काही वेळानं शेतकऱ्याचं कुटुंब उठलं. रस्त्यानं जाऊ लागले. त्यांच्या विरुद्ध दिशेनं आंबा जाऊ लागला.





आता तो डोंगराच्या माथ्यावर आला. रस्त्याच्या कडेला थांबला. डोंगरमाथ्यावरून खाली दरीत पाहू लागला.

ओ हो. किती सुंदर देखावा: आज प्रथमच तो उंच जागेवर उभा राहून नवलाची दुनिया पाहत होता. आता झाडांची ओबडधोबड शरीरे दिसत नव्हती. हिरवी हिरवी डोकी हिरवे हिरवे हात. बस्स त्यांना एवढाच आकार होता. प्रत्येक हिरवेपणात वेगळी छटा होती. पिंपळाच्या पानातून कधी तांबूस, कधी सोनेरी रंगाची लाट फुटत होती. वडाच्या पानांचा काळा जाड हिरवेपणा ठसठसशीतपणे दिसत होता. कडुलिंबाच्या कातरलेल्या पानांची नक्षी उठून दिसत होती. अरे, हे सगळे आपले भाईबंद. आंब्याच्या मनात सगळयांबद्दल दया निर्माण झाली. बिचारे जन्मल्यापासून एका जागी मुकाट उभे. माणसं चांगली जमीन स्वतःसाठी वापरतात. आम्हाला कुऱ्हाडीने तोडतात. आम्हाला मारून घरं बांधतात. आमच्या वस्त्यांना आगी लावतात. ते काही नाही. सगळ्या झाडांनी एकजूट केली पाहिजे. माणसांविरुद्ध बंड केले पाहिजे. माणसांची घरं चिरडून टाकली पाहिजेत. गावात असताना आंब्यानं माणसाच्या सभा पाहिल्या होत्या. त्यांची भाषणं ऐकली होती. माणसांचे पुढारी तावातावाने बोलतात, तसे बोलण्याची आंब्याला इच्छा झाली. त्यानं झाडांचा पुढारी बनण्याचा निश्चय केला.

उंच जागी उभा राहून त्यानं भाषण करायचं ठरवलं. आधी थोडं पाणी मिळेल तर बरं होईल तो मनाशी बोलला.



आता पाण्याची आठवण काढायची नाही असं त्यानं ठरवलं. समोरच्या श्रोत्यांवर त्यानं नजर फिरवली. दूरच्या निळ्या तलावावरून बगळ्यांचा एक थवा उडाला. तो थेट आंब्याच्या खांद्यांवर येऊन बसला. छान. छान. आंबा मनात म्हणाला. माणसांच्या पुढाऱ्यालादेखील अशीच माळ घालीत असतातच. किती चांगला शकून घडला. सगळी झाडे शांत उभी होती.

मग त्यानं हात हलवले. उभारले.त्याला म्हणायचे होते, बंधु भगिनींनो, पण त्याच्या कंठातून शब्दच बाहेर पडेना.

मला पाणी हवं. पाण्याखेरीज बोलता येणार नाही. आंब्याचा जीव कासावीस झाला.


रस्त्यावरून चारपाच माणसं येत होती. ती आली ती त्याच्याजवळच. एकाजवळ काळ्या-पांढऱ्या रंगाचे डबे होते. तर एकाकडे ब्रश होता. त्या माणसांचे आपसात बोलणे सुरू झाले.

आळशांनो, झोपेत आहात की काय? ह्या झाडाला नंबरच दिला नाही. मी काय आता खिशातून नवीन झाड आणून टाकलं काय रे? काम नीट करीत नाहीत. एकानं आपल्या पिशवीतून कसलीशी हत्यारं काढली.

अरे बापरे. आंब्याची भीतीने गाळण उडाली. पण त्याला पावलं बाहेरच काढता येईनात.

त्यांनी त्याच्या पोटावर हत्यारं मारायला सुरुवात केली. तो शुद्धीवर आला, तेंव्हा त्याला आपल्या पोटावर एक चौकोन कोरलेला दिसला. त्या चौकोनात पांढऱ्या रंगाच्या पिछाडीवर लिहिले होते 5879 आणि त्या चौकोनाखाली कमरेभोवती भला लाल पट्टा. छी. छी.






आंब्याला राग आला. शरम वाटली. रडू आल.

हे काय. हे काय अंगावर हा रंग काय म्हणून?

हा लाल पट्टा कशाला? हा दुष्टपणा त्यांनी का केला? त्याने आजूबाजूला पाहिले. सगळ्यांच्या पोटावर चौकोन. कमरेभोवती पट्टा. चौकोनात क्रमांक.

त्यानं इतरांना विचारल, हा काय प्रकार? असं असताना तुम्हाला कोणी विचारलं होतं?

आइनाचा वृक्ष म्हणाला, अरे वेडचा, हे तुझं नशीब समज. आता तू सरकारी वृक्ष झालास. तुला आता कुणी त्रास देणार नाही. सरकारी माणसं आपला सांभाळ करतात.

मी कुणाच्याच मालकीचा नाही. तो रडवेला झाला.

त्याने डोळं पुसून पुन्हा पाहिले. त्याला भोवतालच्या झाडांच्या फांद्यातून पानातून दिसले, डोंगराच्या पायथ्याशी निळभोर पाणी लखलखत होतं. ते पाणी प्रसन्नपणे त्याला बोलावीत होते. ये. ये. इकडे ये. तो आता पाण्याकडे जाणार होता. भरपूर पाणी पिणार होता. मग अंगावरचे डाग धुऊन घासून नाहीसे करणार होता. बेभान होऊन तो नदीच्या दिशेने धाऊ लागला.

अरे, अरे थांब. वेडा आंबा, वेडा आंबा.

पण आंब्यान माग वळून पाहिलच नाही. तो नदी तीरावर आला. सूर्य नुकताच मावळला. पश्चिम आकाशाची लाल नारिंगी छटा पाण्यात पडली होती. पाणी कुंकवासारखं झाल होतं. आंब्याला शब्द आठवले, बाबा, आता कुठं जाऊ नकोस. आमच्या घरी सुखानं रहा.

आंब्यान क्षणभर डोळे झाकून घेतले. मग त्यानं वाहतं पाणी डोळे भरून पाहून घेतलं त्याचे डोळे निवले.


5879

त्यानं हलकेच आपली पावलं पाण्यात टाकली.

ओहो. अहाहा किती शीतलता! त्याची तहान निवली. त्याच्या डोळ्यात आसवं उभी राहिली.

आनंदाची आसवं. कृतज्ञतेची आसवं.

असं परमसुख त्यानं कधीच अनुभवलं नव्हतं. ऐन पावसाळ्यात तो भरपूर पाणी प्यायचा. पण या प्रवाहाची गोडी काही वेगळीच.

तो आणखी नदीच्या कुशीत शिरू लागला. रूपेरी चपळ मासोळ्या त्याच्या पायाला गुदगुल्या करू लागल्या.




सगळं शरीरच पाण्यात झोकून दिलं तर किती मजा येईल. या मासोळ्या पोहताहेत मजेत. तसा मी का पोहू नये? ना उठणे, बसणे, ना फिरणे, ना पोहणे.

सारं आयुष्य मी उभा - उभा - उभा.

आता प्रवाहाबरोबर जायचं. वाहत - वाहत. नवे तीर, नवे देश पाहत पुढं जायचं.

डोळे मिटून वाहत्या पाण्याची शीतल शीळ ऐकायची. लाटांनी केलेल्या मजेशीर कानगोष्टी ऐकायच्या. असंच वाहत, पोहत समुद्राला भेटायचं.

निळा, खोल, अगाध, अनंत सागर.
तो अलगद, अल्लद मधल्या धारेत शिरला.



अगदी थोडा वेळ डोके खाली गेले. थोडावेळच त्याला गुदमरल्यासारखं झालं. मग त्याला तरंगता येऊ लागलं. आता तो प्रवाह नेईल तिकडे जाणार होता. आपणहून काही धडपड करणार नव्हता. दोन्ही तीरावर झाडं होती. त्याला कुणी वेडा म्हणत होती. कुणी भयभीत होत होती. पण वेडचा आंब्याचं तीराकडे लक्ष नव्हते.

एका नव्या प्रदेशाकडे, एका नव्या जीवनाकडं वेडचा आंब्याचा प्रवास सुरू झाला.

वेड विलक्षण होते.
या वेडापासून तो कधीच मागे वळणार नव्हता.





रु. 14.00 ISBN 81-237-0604-9

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया